**अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त (आस्थापना)**
**यांचे कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका,**
**भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०१ १०१.**
**जा.क्र.माअधि/अपिल/११७/२०२६-२७**
**दि. 30/०४/२०२६**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री. जितेंद्र अच्युत शेणॉय ............... अपिलार्थी
००४, हरी निवास, मिरा गाव,
मिरारोड (पूर्व) ४०१ १०७
मो.क्र. ८६५२८३०७८९

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा ...............प्रतिवादी
सहा. आयुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**-: विवेचन :-**

श्री. जितेंद्र अच्युत शेणॉय यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (आस्थापना) यांचेकडे खालील माहिती मिळणेबाबत दि. २६/०२/२०२६ रोजी अर्ज सादर केला.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील वर्ग-३ चे अधिकारी यांची कर्तव्य सूची मिळावी. वर्ग-४ कर्मचारी यांची कर्तव्य सूची मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्याने दि. २१/०४/२०२६ रोजी अपिल दाखल करण्यात आलेले आहे.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि. ३०/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मनपा/उप.आ(मु.)/ मा.अ/११४/२०२६-२७, दि. २४/०४/२०२६ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, अपिलार्थी व श्री. सुनिल यादव, जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (आस्थापना) सुनावणीस उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-**

जनमाहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

**जनमाहिती अधिकारी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-**

अपिलार्थी यांना जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./६२/२०२५-२६, दि. २३/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागप्रमुख तथा जन माहिती अधिकारी यांना जॉब चार्टची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कळविण्यात आले आहे.

**-: निर्णय :-**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. सर्व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख यांनी अपिलार्थी यांना आपल्या विभागाच्या जॉब चार्टची माहिती ०७ दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देणेत यावी.

३. सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(डॉ. सचिन बांगर)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१. श्री. जितेंद्र अच्युत शेणॉय
००४, हरी निवास, मिरा गाव,
मिरारोड (पूर्व) ४०१ १०७
मो.क्र. ८६५२८३०७८९

२. सर्व जनमाहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका

३. माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप-आयुक्त (मु.) यांचे कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका.